**MHGO050007052022**

**<u>सडक अर्जुनी येथील न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, ता. सडक अर्जुनी, जि. गोंदिया येथील राष्ट्रीय लोकअदालतमध्ये प्रकरण २१ अन्वये आरोपीची संक्षिप्त संपरिक्षा</u>**

**<u>सं.फौ.ख.क्र. ३७६/२०२२</u>**
**<u>निशाणी क्र. ०२</u>**

| | | |
|---|---|---|
| १. अपराध घडल्याचा दिनांक | — | ०९/११/२०२२ |
| २. तक्रार दाखल केल्याचा दिनांक | — | २८/११/२०२२ |
| ३. तक्रार दाखल करणा—याचे नांव व पत्ता | — | सरकार तर्फे म. पो. केंद्र डोंगरगाव, जि. गोंदिया |
| ४. आरोपीचे नांव, वय व पत्ता | — | ए.सि.ई. लॉजीस्टीक लिमीटेड **मार्फत—** पिंटु कुमार सिंग (कंपनी मॅनेजर) राहणार :— नेहर ईस्ट स्टेशन टि आर सि. एच. नं. एफ. बि. १११२०६३७ नॅगालेंड. |

५. **गुन्हयाचा तपशील—**

दि. ०९/११/२०२२ रोजी दुपारी ०३:०९ वाजताच्या सुमारास राष्ट्रीय महामार्ग क्र. ६, म. पो. केंद्र डोंगरगाव समोर, ता. सडक अर्जुनी, जि. गोंदिया येथे सार्वजनिक रस्त्यावर तुम्ही तुमच्या ताब्यातील वाहन क्र. एन. एल. ०१— के. १५८९ हे सेकंड लेनवर चालविणे आवश्यक असतांनासुध्दा सेकंड लेनवर न चालवता प्रथम लेनवर सतत चालवित असतांना दिसुन आल्याने पोलीसांनी तुम्हाला थांबण्याचा ईशारा केला असता तुम्ही सदर ट्रक न थांबविता पुढे निघुन गेले व अशाप्रकारे तुम्ही मोटर वाहन अधिनियमाचे कलम ६(१) चे उल्लघंन करून कलम १७७ प्रमाणे शिक्षेस पात्र आणि न्यायालयाच्या दखलगिरीत असलेला अपराध केला आहे.

**वरील गून्हयासंबंधी तपशील आरोपीने व्हीडीओ कॉन्फरन्सींगद्वारे हजर राहुन गुन्हा कबुल केला आहे व दंड भरला आहे.**

**आरोपीचे प्रतिकथन**

प्रश्न—१. तुम्हाला तुमचे विरुध्द दाखल झालेल्या खटल्याचे कागदपत्र मिळाले काय ?
उत्तर होय.

प्रश्न—२. तुम्हाला तुमचेवर ठेवण्यात आलेला अपराध वाचुन दाखविला तो तुम्हास समजला काय?
उत्तर होय.

प्रश्न—३. तुम्हाला गुन्हा कबुल आहे काय ?
उत्तर होय, मला गुन्हा कबुल आहे.

आरोपीने व्हीडीओ कॉन्फरन्सींगद्वारे गुन्हा कबुल केल्याने आरोपीची सहीची आवश्यकता नाही.

आरोपीने श्री. पोलीस नाईक बनोटे, बं. नं. १७५८ नेमणुक मु. पो. केंद्र डोंगरगाव यांच्या मार्फत दंड भरला आहे व आरोपीस त्यांनी ओळख दिली आहे.

दिनांक : ०९.१२.२०२३ समक्ष,

स्वा/—
(डॉ. विक्रम अं. आव्हाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
सडक अर्जुनी.

**न्यायनिर्णय**
**(दिनांक ०९ डिसेंबर २०२३ रोजी पारीत)**

आरोपी विरूध्द सदरचे प्रकरण मोटर वाहन अधिनियमाचे कलम ६(१) चे उल्लघंन करून कलम १७७ अन्वये गुन्हा केल्याबाबत दाखल करण्यात आले आहे. आरोपीने कोणत्याही दबावाखाली न येता व्हिडीओ कॉन्फरन्सींगद्वारे स्वत:हुन गुन्हा कबुल केला आहे. मी आरोपीस गुन्हा कबुल केल्यानंतर होणा—या शिक्षेबाबत सविस्तर सांगितले. आरोपीने असे कथन केले आहे की, त्याच्या हातुन पहील्यांदाच गुन्हा घडला आहे. अर्थिक परिस्थिती गरीबीची असुन कमीत कमी दंड करावा अशी विनंती केली. प्रस्तुतच्या प्रकरणाची हकीकत पाहीली असता, अपराधाचे स्वरूप व सर्व परिस्थिती लक्षात घेवुन आरोपीला पुन्हा एकदा सुधारण्याची संधी देणे गरजेचे ठरते. त्यामुळे परिवीक्षा अधिनियम १९५८ नुसार आरोपीस भविष्यात चांगले वर्तन ठेवण्याची समज देवुन दंडाची शिक्षा देणे न्यायाचे होईल. करीता मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

**१)** आरोपीस मोटर वाहन अधिनियमाचे कलम ६(१) चे उल्लघंन करून कलम १७७ अन्वये अपराधासाठी दोषी ठरविण्यात येते. त्यास रक्कम **रूपये ३००/— (अक्षरी तिनशे रूपये फक्त)** द्रव्यदंडाची शिक्षा ठोठावण्यात येते. दंड न भरल्यास त्यास ०३ दिवसांचा साधा कारावास भोगावा लागेल.

**२)** फौजदारी प्रक्रिया संहीता कलम ३६३ अन्वये सदर न्यायनिर्णयाची एक प्रत आरोपीस विनाशुल्क देण्यात यावी.

स्वा/—
**दिनांक : ०९.१२.२०२३** **(डॉ. विक्रम अं. आव्हाड)**
**ठिकाण : सडक अर्जुनी** **न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,**
**सडक अर्जुनी.**

श्री. पोलीस नाईक बनोटे, बं. नं. १७५८
यांनी व्हिडीओ कॉन्फरन्सींद्वारे आरोपीची ओळख दिली आहे.
..................................